आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या...

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन आदेश क्रमांकः सकआ -२०१९/प्र.क्र.२१० (भाग-१)/ आस्था-२

मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक

मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९.

वाचा: शासन आदेश क्र. सकआ २०१९/प्र.क्र.१५७/आस्था-२, दि.३१ मे, २०१९

शासन आदेश:-

प्रस्तावना:-

राज्य मंत्रिमंडळाने दि.१६ जुलै, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे तात्काळ भरण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, चंद्रपूर व गोंदिया या आदिवासी तसेच, नक्षलग्रस्त प्रभावित जिल्ह्यांतील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या आदिवासी तसेच, नक्षलग्रस्त जिल्ह्यातील विभागाच्या अखत्यारितील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ संवर्गातील रिक्त पदे बदलीने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या आदिवासी तसेच, नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या नियम- ४ मधील तरतुदीनुसार समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट अ संवर्गातील खालील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात येत असुन, त्यांच्या नावासमोरील स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ क्र	अधिकाऱ्यांचे नाव	पदनाम व कार्यरत ठिकाण	बदलीने पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३	४
१	श्री. पी. जी. कुलकर्णी	सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, वर्धा	सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर
२	श्री.एम.टी. वानखेडे	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक	सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गोंदिया
३	श्री.टी.डी.बरगे	सहाय्यक आयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, वर्धा या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.पी.जी. कुलकर्णी यांच्याकडे सोपविण्यात येत आहे.

३. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे -

१. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर आयुक्त समाज कल्याण, पुणे यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यास बदली झालेल्या पदावर रुजु होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.
२. बदली झालेला अधिकारी संबंधित कार्यालयातून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यावर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या अधिकाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतीक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्‌भवल्यास संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांस जबाबदार धरण्यात येईल.
३. बदली आदेशात बदल करुन घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे अधिकारी शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१८१४५३७५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY GIRIDHAR PATIL

Digitally signed by SANJAY GIRIDHAR PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0f7d1eee7567d430eefd928eefa78ed2a6072c4ce8f3c0aa4efaf26d9c32daeb, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bd10fe5a55495bc381e7b4d4b658250c74eb3f55113a21fd21c8620f04c2c257, ou=SOCIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY GIRIDHAR PATIL
Date: 2019.09.25 12:35:39 +05'30'

(सं.गि.पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित अधिकारी (आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत)

प्रत,

१) आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
३) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
५) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण , संस्था पुणे
६) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
७) सर्व अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०) मा.मंत्री (सा.न्या. व वि.स.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
११) मा.राज्यमंत्री (सा.न्या. व वि.स.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
१२) सचिव (सा. न्या. व वि. स. विभाग) यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय मुंबई
१३) निवडनस्ती आस्था-२.